**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि जर्मनी दरम्यान विविध क्षेत्रात सामंजस्य करार

- महायुतीमध्ये २७७ जागांवर एकमत, महाविकास आघाडीतले तिन्ही पक्ष प्रत्येकी ९० जागा लढवणार

- दाना चक्रीवादळामुळं ओडिशात जीवितहानी नाही, हजारो हेक्टरवरच्या भात पिकांचं नुकसान

**आणि**

- भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडकडे ३०१ धावांची आघाडी

**<><><><><>**

भारत आणि जर्मनीने आज ग्रीन हायड्रोजन, तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. नवी दिल्ली इथं शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चॅन्सलर ओलाफ शोल्झ यांच्या उपस्थितीत हे करार करण्यात आले. गोपनीय माहितीची देवाणघेवाण आणि संरक्षण याबाबतही दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. इंडो-जर्मन ग्रीन हायड्रोजन रोडमॅपसाठी वचनबद्ध असल्याचं दोन्ही देशांनी यावेळी सांगितलं. तसंच कौशल्य विकास, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रात सहकार्यासाठी सामंजस्य करार करण्यात आले.

यावेळी झालेल्या संयुक्त वार्ताहर परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रशिया-युक्रेन आणि पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारत शांतता प्रस्थापित करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं सांगितलं. इंडो पॅसिफिक क्षेत्रात जलवाहतुकीचं स्वातंत्र्य गरजेचं असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात आज दुसऱ्या दिवशीही उमेदवारी अर्ज भरायला उमेदवारांची गर्दी दिसून आली. उपमुख्यमंत्री **देवेंद्र फडणवीस** यांनी **दक्षिण पश्चिम नागपूर विधानसभा** मतदारसंघासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. **शिवसेना** नेते आणि मंत्री **उदय सामंत** यांनी **रत्नागिरी विधानसभा** मतदारसंघातून, **आशिष शेलार** यांनी **वांद्रे पश्चिम** मतदारसंघातून तर **शिवसेनेचे** नेते **प्रताप सरनाईक** यांनी **ओवळा माजीवडा** मतदारसंघातून अर्ज दाखल केला. विधानसभा अध्यक्ष आणि भाजपा नेते **राहुल नार्वेकर** यांनी **कुलाबा** मतदारसंघातून अर्ज भरला. **महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार बाळा नांदगावकर** यांनी आज **शिवडी विधानसभा** मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित होते.

**<><><><><>**

महायुतीमध्ये २७७ जागांवर एकमत झालं असून उर्वरित जागांवर दोन दिवसांत निर्णय होईल, अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली. भाजपाची दुसरी आणि तिसरी यादी केंद्रीय निवडणूक समितीच्या मंजुरीनंतर जाहीर होईल. तोपर्यंत इच्छुकांनी अर्ज भरू नये, असं

त्यांनी भाजपा कार्यकर्त्यांना बजावलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राज्यात सुमारे १३ ठिकाणी सभा होणार आहेत. सध्या मुंबई, नवी मुंबई, गोंदिया, अकोला, नांदेड आणि धुळे ही ठिकाणं निश्चित झाली आहेत. उर्वरित लवकरच होतील, असं त्यांनी सांगितलं. नवाब मलिक यांच्या बाबतचा निर्णय अजित पवार घेतील. आमदार रवी राणा त्यांच्याच युवा स्वाभिमानी पक्षात राहणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

महाविकास आघाडीतले तिन्ही पक्ष प्रत्येकी ९० जागा लढवणार आहेत. उरलेल्या १८ जागा मित्र पक्षांना दिल्या जातील, अशी माहिती काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी आज दिली. राज्यात विधानसभा निवडणूक हरण्याच्या भीतीने भारतीय जनता पक्ष अफवा पसरवत असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या एका विधानाची मोडतोड करून या अफवा पसरवण्याचा भाजपाचा प्रयत्न महाराष्ट्रात चालणार नाही, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं आज दुसरी यादी जाहीर केली. पक्षाचे अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याची घोषणा केली. यात अणुशक्तीनगर इथून नवाब मलिक यांची मुलगी सना मलिक, इस्लामपूरमधून निशिकांत पाटील,

तासगाव - कवठे महांकाळ मधून संजय पाटील, वडगाव शेरी इथून सुनील टिंगरे, शिरूर इथून ज्ञानेश्वर कटके यांना उमेदवारी देण्य़ात आली आहे. दरम्यान, काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दीकी आणि भाजपाचे प्रताप पाटील चिखलीकर यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर पक्षानं चिखलीकर यांना लोहा मतदारसंघातून तर सिद्दिकी यांना वांद्रे पूर्व इथून उमेदवारी जाहीर केली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं पाच उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. यात कसबा पेठेतून गणेश भोकरे, चिखलीतून गणेश बरबडे, कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून अभिजीत राऊत यांना उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय केजमधून रमेश गालफाडे आणि कलीना इथून संदीप हुटगी निवडणुकीच्या रिंगणात असतील.

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी आज उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया संपली. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबर ला ४३ मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी सरायकेलामधून तर ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन पक्षाचे प्रमुख सुदेश कुमार महतो यांनी सिल्लीमधून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या **मुंबई शहर या जिल्ह्यातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

देशातल्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्य सरकारांना विशेष तयारी ठेवण्याचे आदेश दिले आहेत. आरोग्य सेवेचे महासंचालक डॉ. अतुल गोयल यांनी राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या आरोग्य विभागांना वायू प्रदूषणाच्या तयारीबाबत पत्र लिहिलं आहे. या पत्रात वायू प्रदूषणाचा श्वसनक्रिया, हृदय तसंच रक्तवाहिन्यांसंबंधीच्या यंत्रणांना प्रभावित करणाऱ्या आजारांशी थेट संबंध असल्याचं गोयल यांनी म्हटलं आहे. लहान मुलं, गरोदर महिला आणि वृद्धांवर याचा अधिक परिणाम होत असल्याने राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांनी जनजागृती करण्याचे निर्देश या पत्रातून दिले आहेत.

**<><><><>**

लष्कर आणि इतर यंत्रणांनी जम्मू-काश्मीरमध्ये सातत्यानं आणि झोकून देऊन केलेल्या प्रयत्नांमुळेच या भागात शांतता, समृद्धी आणि सुरक्षितता नांदत आहे, असं प्रतिपादन लष्कराच्या उत्तर विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल एम. व्ही. सुचिंद्र कुमार यांनी केलं आहे. काश्मीरमध्ये नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यांबद्दल श्रीनगर इथं गुरुवारी झालेल्या

संयुक्त बैठकीत चर्चा झाली. याचा सामना करण्यासाठीचं धोरण निश्चित केलं असल्याची माहितीही त्यांनी दिली. हिंसाचाराचं चक्र भेदणं, दहशतवाद्यांच्या यंत्रणा मोडून काढणं, तरुण आणि महिलांचं सक्षमीकरण, शिक्षण आणि खेळाला प्रोत्साहन देणं, तसंच या भागाच्या समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचं पुनरुज्जीवन करण्यावर भर देण्यात येत असल्याचंही त्यांनी सांगितलं. गेल्या पाच वर्षांत जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दलांनी ७२० दहशतवाद्यांना ठार केल्याची माहितीही कुमार यांनी दिली.

**<><><><><>**

दाना- चक्रीवादळाचा फटका बसलेल्या ओडिशातल्या केंद्रपारा, भद्रक, बालासोर आणि जगतसिंगपूर जिल्ह्यांमधली परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी मदत कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. या चक्रीवादळामुळे मानवी जीवितहानी झाल्याचे कोणतेही वृत्त नाही. या भागातल्या हजारो हेक्टर भातशेतीच्या पिकांचे नुकसान झाले आहे. या चक्रीवादळामुळे अनेक भागात वीज तारा तुटल्या असून मोठमोठी झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडले आहेत. एनडीआरएफ, ओडीआरएएफ, अग्निशमन सेवा, ऊर्जा आणि इतर विभागांचे कर्मचारी रस्ते आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी चोवीस तास काम करत आहेत. मुख्यमंत्री मोहन चरण माझी भुवनेश्वरमधल्या चक्रीवादळानंतरच्या परिस्थितीचा आढावा घेत आहेत. सरकारने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या दोन दिवसांच्या सुट्याही रद्द केल्या आहेत.

**<><><><><>**

हरियाणा विधानसभेचं पहिलं अधिवेशन आज सुरू झालं. हंगामी अध्यक्ष डॉ. रघुबीर सिंग यांनी नव्या सदस्यांना आमदारकीची शपक्ष दिली. त्यानंतर हरविंदर कल्याण यांची विधानसभा अध्यक्ष म्हणून तसंच क्रिशन लाल मिढ्ढा यांची उपाध्यक्ष म्हणून एकमतानं निवड झाली.

**<><><><><>**

कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याच्या दुसऱ्या डावात न्यूझिलंडने आज दिवसअखेर ५ गड्यांच्या मोबदल्यात १९८ धावा केल्या. यासह न्यूझिलंडने सामन्यात ३०१ धावांची आघाडी घेतली आहे. वॉशिंग्टन सुंदरने चार तर आर. अश्विन याने एक गडी बाद केला. त्याआधी भारताचा पहिला डाव १५६ धावांवर आटोपला. न्यूझीलंडच्या गोलंदाजांपुढे भारतीय फलंदाजी ढेपाळली. विराट कोहली, रोहित शर्मा, रिषभ पंत हे खेळाडू फारशी चमक न दाखवताच तंबूत परतले. यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल यांनी प्रत्येकी ३० धावा केल्या. तर रवींद्र जडेजा यानं ३८ धावा केल्या. न्यूझीलंडकडून सतनेर याने सर्वाधिक ७ गडी बाद केले. काल सामन्याच्या पहिल्या दिवशी न्यूझीलंडनं भारतासमोर २५९ धावांचं आव्हान ठेवलं होतं.

**//<><><><><>//**